**प्रेसनोट        ता. ०७/११/२०२४**

# चिंचवड पोलीस स्टेशनकडुन ३५ लाखाची रोकड जप्त

आज दि. ०७/११/२०२४ रोजी रोजी सकाळी ११/०० वा. सुमारास चाफेकर चौकाजवळ, चिंचवड, पुणे या ठिकाणी तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलिंग करीत असताना त्यांना एक महिंद्रा बोलेरा गाडी नं. एम.एच.०१/सी.व्ही./६५४५ ही गाडी संशयितरित्या/घाईगबडीत जात असल्याचे दिसले. सदर गाडीचा संशय आल्याने पेट्रोलिंगवरील पोलीसांनी गाडी थांबविण्याचा इशारा करुन त्यांना पोलीस ओळख सांगुन त्यांना घाई गडबडीत जाण्याचे कारण विचारता त्यांनी सांगितलेले कारण संयुक्तिक वाटत नसल्याने गाडी चिंचवड पोलीस स्टेशन येथे आणुन गाडीची पाठीमागील शटर उघडून पाहणी केली असता एका लोखंडी पेटीत वेगवेगळया दराच्या **एकुण ३५,११,२००/- रुपये (अक्षरी-पत्तीस लाख, अकरा हजार, दोनशे रुपये)** भारतीय चलनाच्या नोटा मिळुन आले आहेत. सदर रकमेबाबत गाडीतील व्यक्तिंनी विश्वासहार्य माहिती न दिल्याने निवडणुक आदर्श आचार संहितेच्या अनुषंगाने वरील रक्कम जप्त करण्यात आलेली आहे. तसेच केलेल्या कारवाई बाबत निवडणुक निर्णय अधिकारी, २०५ चिंचवड विधानसभा मतदारसंघ, मा. सहा. आयुक्त, आयकर विभाग यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. निवडणुक निर्णय अधिकारी व आयकर विभागा यांचेकडुन पुढील चौकशी चालु आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त सो. श्री. विनयकुमार चौबे, मा. सह पोलीस आयुक्त सो. श्री. शशीकांत महावरकर, मा. अप्पर पोलीस आयुक्त सो. श्री. वसंत परदेशी, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-आयुक्त सो. परिमंडळ-१ श्रीमती स्वप्ना गोरे, सहा. पोलीस आयुक्त, चिंचवड विभाग, श्री. मुकुट पाटील, चिंचवड पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र कोळी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. दिपक गोसावी, पोउनि श्री. अजित दुधे, पोउनि श्री. जगताप, पोहवा श्री. गेंगजे, पोहवा सोनपेटे, पोहवा, आढारी, पोशि पाटील, पोशि फरांदे यांनी केलेली आहे.

( स्वप्ना गोरे )<br>
पोलीस उप-आयुक्त<br>
परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड